# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी पालघर कार्यालय

## (आस्थापना शाखा)

मुख्य प्रशासकीय इमारत, नवीन विक्रीकर कार्यालय इमारत, नवली-पालघर, ता.पो. पालघर जि.पालघर

फोन नंबर ०२५२५-२५३१११ Email ID- estcollectorpalghar@gmail.com


क्र.मह./आस्था/कक्ष-१/टे-२/एसआर-नं.०२७/२०१८ दिनांक -२७/०३/२०१८

**विषय :- दि.०१/०१/२०१६ रोजी कार्यरत असलेल्या तलाठी संवर्गातील कर्मचाऱ्यांची अंतिम ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.**

**ज्ञापन :-**

सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दि.२१/१०/२०११ मधील तरतुदीनुसार पालघर जिल्हाधिकारी अधिनस्त उपविभागीय अधिकारी आस्थापनेवरील स्थानापन्न तलाठी संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक ०१/०१/२०१६, रोजीची ज्येष्ठता दर्शविणारी अंतरिम (तात्पुरती) ज्येष्ठता यादी या कार्यालयाकडील ज्ञापन क्र.मह./आस्था/ कक्ष-१/टे-२/एसआर-न.१३८/२०१७, दि.३०/०६/२०१७ अन्वये प्रसिध्द करणेत आली होती. सदर यादी प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत आक्षेप/सुचना दाखल करण्यात येवून सदर आक्षेप/ सुचना कार्यालय प्रमुखांच्या अभिप्रायासह सादर करण्यात याव्यात, असे नमुद करण्यात आलेले होते.

अंतरिम ज्येष्ठता यादीबाबत सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, यांचेकडून सदर यादी कार्यालयीन नोटीस बोर्डवर प्रसिध्द केलेचा अहवाल प्राप्त करुन घेतला असून, या कार्यालयाचे स्तरावर प्राप्त झालेल्या आक्षेप/सूचना शासन निर्णयानुसार मान्य/अमान्य करुन प्रपत्र अ तयार करणेत आले आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियम १९८२ मधील तरतुदीनुसार एकूण १४९ कर्मचाऱ्यांची दिनांक ०१/०१/२०१६ रोजीची तलाठी संवर्गाची अंतिम ज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

सर्व कार्यालय/ शाखा प्रमुख यांनी सदरची अंतीम ज्येष्ठता यादी त्यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डवर प्रसिध्द करुन, त्यांचे अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या सर्व संबंधीत तलाठी संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावी व त्याबाबतचा अनुपालन अहवाल तात्काळ सादर करण्यात यावा.

**सही/xxx**
**(डॉ.प्रशांत नारनवरे)**
**जिल्हाधिकारी पालघर**

**प्रत :-**

१. मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांचे माहितीसाठी सविनय सादर.
२. अपर जिल्हाधिकारी पालघर, मुख्यालय जव्हार, यांना माहितीसाठी रवाना.
३. उप विभागीय अधिकारी डहाणू/पालघर/वसई/जव्हार/वाडा
४. तहसिलदार (सर्व)
५. जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी, पालघर.

२/- सदर जेष्ठता यादी या कार्यालयाचे संकेत स्थळावर (www.collectorpalghar.nic.in) प्रसिध्द करावी. सदर यादी संकेतस्थळावर ३० दिवस ठेवण्यात यावी.

**(स्थळ प्रतिवर मा.जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे)**

जिल्हाधिकारी पालघर करिता